सत्यमेव जयते

रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१

फोन नं. - (०२०) २६०५०६४१ ई मेल आयडी - sceapune@gmail.com


**निवडणूक महत्वाचे**

जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/अर्हता दिनांक/आदेश/ ६६२० /२०२३

दिनांक : ०३ /१०/२०२३

**वाचावे**:- १. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील अध्यादेश दिनांक ०७.०६.२०२३

२. प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र.४८६४/२०२३, दिनांक २८.०६.२०२३

३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील आदेश दिनांक २१.०८.२०२३

४. प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र.५८८२/२०२३, दिनांक २४.०८.२०२३

**प्रस्तावना**:-

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतूदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे (२५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) अधिक्षण, संचालन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविलेली असून उक्त कलमाच्या उपकलम (१) नुसार सहकारी संस्थांच्या समितीच्या सार्वत्रिक निवडणूका, नैमित्तिक पद व समिती सदस्यांच्या पदाधिकारी यांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, सहकारी सं स्थांच्या निवडणूका घेण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ हा नियम दिनांक १२.०९.२०१४ पासून अंमलात आलेला असून सदर नियमात वेळोवेळी सुधारणा झालेल्या आहेत. त्याप्रमाणे सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, शासनाने वाचावे क्र. १ च्या अध्यादेशानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २, कलम २६ कलम २७ व कलम ७३ अ मध्ये सुधारणा करुन क्रियाशील व अक्रियाशील सभासदांची तरतुद लागू केलेली होती. सदरची तरतुद ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी अंतिम मतदार यादी दिनांक ०७.०६.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेली नाही, अशा संस्थांच्या निवडणूकीसाठी लागू केलेली होती. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र. २ च्या परिपत्रकानुसार शासन अध्यादेशातील सुधारित तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता मतदार यादया तयार करणेबाबत सर्व जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना निर्देश दिलेले होते. आणि,

ज्या अर्थी, शासनाने वाचावे क्र. ३ चे आदेशान्वये वाचावे क्र. १ चा अध्यादेश मागे घेतलेला असल्यामुळे सदर अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर झालेले नाही. परिणामी सुधारीत तरतुद लागू होणे दिनांक २१.०८.२०२३ पासून बंद झालेले आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र. ४ च्या परिपत्रकानुसार वाचावे क्र. २ चे परिपत्रक रद्दबातल केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, शासन अध्यादेश लागू असलेल्या कालावधीत म्हणजेच दिनांक ०८.०६.२०२३ ते दिनांक २१.०८.२०२३ या कालावधीत सहकारी संस्थांच्या निवडणूकांकरीता वाचावे क्र. १ च्या अध्यादेशातील तरतुदीनुसार प्रारूप व अंतिम मतदार यादया प्रसिध्द झालेल्या आहेत. मात्र वाचावे क्र. १ च्या शासन अध्यादेशातील सुधारीत तरतुदींचे अस्तित्व संपुष्टात आल्यामुळे सदर कालावधीत तयार झालेल्या प्रारूप मतदार यादया व अंतिम झालेल्या मतदार यादया नव्याने प्रसिध्द करुन प्रचलित तरतुदीनुसार सुधारीत प्रारुप व अंतिम मतदार यादया प्रसिध्द करणे आवश्यक झालेले आहे. आणि,

ज्या अर्थी, प्रारूप व अंतिम मतदार यादयांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ९५४७/२०२३ व इतर २ याचिका दाखल झाल्या असता मा. न्यायालयाने सदर याचिकांमध्ये दिनांक ०७.०९.२०२३ रोजी आदेश पारीत करून कायदयातील तरतुदीनुसार नव्याने मतदार यादी तयार करणेबाबत व निवडणूक प्रक्रिया पूर्ण

करणेबाबतचे निर्देश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास दिलेले आहेत. तसेच मतदार यादीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ७३८०/२०२३, ७८३८/२०२३ व ७८४०/२०२३ दाखल झाल्या असता मा. न्यायालयाने सदर याचिकांमध्ये अनुक्रमे दिनांक ०६.०९.२०२३ व दिनांक १४.०९.२०२३ रोजी आदेश पारीत करून नव्याने मतदार यादी तयार करण्यास अनुमती दिलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने दिनांक २८.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक ३०.०९.२०२३ पर्यंत स्थगित केलेल्या आहेत. स्थगितीचा कालावधी दिनांक ३०.०९.२०२३ रोजी संपुष्टात आलेला असून शासनाने सदर कालावधीत वाढ केलेली नाही. परिणामी सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणे क्रमप्राप्त झालेले आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ (२) व नियम ९ (२) मधील दुसऱ्या परंतुकानुसार अकल्पित परिस्थितीत किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सहकारी संस्थांच्या समितीची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेतल्या जाऊ शकत नाहीत अशा सहकारी संस्थांच्या बाबतीत प्रारूप मतदार यादी प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अर्हता दिनांकाच्या आधारे तयार करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ (२) व नियम ९ (२) मधील तिसऱ्या परंतुकानुसार ज्या सहकारी संस्थेवर कलम ७७-अ व कलम ७८-अ अंतर्गत प्रशासक/प्राधिकृत अधिकारी नियुक्त झालेला आहे अशा सहकारी संस्थांच्या बाबतीत प्रारूप मतदार यादी प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अर्हता दिनांकाच्या आधारे तयार करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

त्या अर्थी, प्राधिकरण सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी नव्याने मतदार यादया तयार करणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश:-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच), नियम ६ व नियम ९ मधील तरतुदीन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी नव्याने मतदार यादया तयार करणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता दिनांक ०८.०६.२०२३ ते दिनांक २१.०८.२०२३ या कालावधीत प्रारूप अथवा अंतिम मतदार यादया प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत अशा सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांकरीता प्रारूप मतदार यादया **दिनांक ०१.१०.२०२३** या अर्हता दिनांकावर तयार कराव्यात.

२. संपूर्ण मतदार यादी कार्यक्रम प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा व कमीतकमी आकाराच्या संक्षिप्त मतदार यादी कार्यक्रमास जास्त खपाच्या एकाच स्थानिक वर्तमान पत्रात शासन मान्य दराने व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

३. सदर अर्हता दिनांकास अनुसरून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ यांतील प्रचलित तरतूदींचे अनुपालन करून प्राथमिक मतदार यादया तयार कराव्यात.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने**

(वसंत पाटील)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
सत्यमेव जयते

**प्रति,**

१) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

२) तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत:-**

१. मा. अपर मुख्य सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. मा. आयुक्त (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. मा. आयुक्त (दुग्ध), महाराष्ट्र राज्य, मुंबई